
# मार्क्सवादी अभ्यासपद्धती इतिहासाचा गुंता । सोडवी जी



हितेश पोतदार

अर्थबोध



मला मार्क्सची आठवण एखाद्या अवतारासारखी, मानवजातीला वाचवण्यासाठी आलेल्या मसीहासारखी कधीच करायची नाही. मार्क्सला देवळं नकोत, हारतुरे नकोत आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे, त्याच्याबद्दल आंधळं भक्तिपर होणं नको. ही आहे, त्या मार्क्सच्या विचारपद्धतीची आठवण, ज्याने समाज बदलण्यासाठी आधी त्याला समजून घ्यावं लागतं, हे शिकवलं. मार्क्सचं खरं योगदान केवळ भांडवलशाहीवर चिकित्सात्मक टीका करण्यात नव्हतं. त्याचं खरं बळ होतं, 'समाजाचा ऐतिहासिक आणि भौतिक दृष्टिकोनातून' अभ्यास करण्याची पद्धत देणं आणि ते समजून घेताना आपलं संवेदनशील माणूसपण जपणं...

“Marx established a new science: the science of the history of "social formations'. To be more precise, I should say that ... just as Thales opened up the "continent' of mathematics for scientific knowledge, and Galileo opened up the "continent' of physical nature for scientific knowledge  Marx "opened up' for scientific knowledge a new "continent', that of history”

–Louise Althusser, in Lenin and Philosophy and Other Essays'

मागच्या वर्षी मी लंडनमधील हाइगेट सिमेटरीमध्ये गेलो होतो. तिथे कार्ल मार्क्सचे थडगे आहे. मी मार्क्सच्या थडग्यापुढ्यात उभा होतो. त्या अनुभवानंतर एक गोष्ट ठामपणे सांगतो, मार्क्स तिथे अगदी व्यवस्थित दफन केला गेलेला आहे. तो जमिनीच्या आठ-दहा फूट आत शांतपणे झोपला आहे. त्याच्या डोक्यावर कॉंक्रिटचा गुंडाळा आहे. कुणी त्याला उठवण्यासाठी आलेलं नाही, आणि तो स्वतःही पुन्हा उठण्याच्या कोणत्याही विचारात नाही. जणू आपला ऐहिक प्रवास संपवून, जगातील 'श्रमिक वर्गा'च्या भवितव्यासाठी आपली जबाबदारी पार पाडल्याच्या समाधानात तो चिरविश्रांती घेतोय.

पण स्मशानभूमीतील ही शांतता भ्रामक आहे. कारण मार्क्स जिथे चिरनिद्रा घेतो आहे, त्याच जगात वेगवेगळ्या कानाकोपऱ्यांमध्ये भारतात, लॅटिन अमेरिकेत, आफ्रिकेत, युरोपात कधी शोषितांचा आवाज दाबला जातो, श्रमिकांवर अन्याय होतो, विषमतेचं स्वरूप अधिकाधिक भेसूर होतं तेव्हा मार्क्सचा विचार परत येतो. जगभर, त्याच्या विचारांचं सावट सारखं उठतं. मुंबईच्या झोपडपट्ट्यांपासून ब्राझीलच्या जंगलांपर्यंत. त्याचं विचारविश्व, त्याचं विश्लेषण करण्याचं भयंकर शक्तिशाली आणि क्रांतिकारी पद्धतिशास्त्र, ते मात्र आपली जागा घेतं.

ही पुनरागमनं या ग्लोरिफाइड, मूर्तिपूज्य मार्क्सची नाहीत. मला मार्क्सची आठवण एखाद्या अवतारासारखी, मानवजातीला वाचवण्यासाठी आलेल्या मसीहासारखी कधीच करायची नाही. मार्क्सला देवळं नकोत, हारतुरे नकोत आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे, त्याच्याबद्दल आंधळं भक्तिपर होणं नको. ही आहे, त्या मार्क्सच्या विचारपद्धतीची आठवण, ज्याने समाज बदलण्यासाठी आधी त्याला समजून घ्यावं लागतं, हे शिकवलं. मार्क्सचं खरं योगदान केवळ भांडवलशाहीवर टीका करण्यात नव्हतं. त्याचं खरं बळ होतं, 'समाजाचा ऐतिहासिक आणि भौतिक दृष्टिकोनातून' अभ्यास करण्याची पद्धत देणं आणि ते समजून घेताना आपलं संवेदनशील माणूसपण जपणं. ज्याला आपण म्हणतो, ऐतिहासिक भौतिकवाद आणि द्वंद्वात्मक भौतिकवाद.

आपल्याभोवतीचं आयुष्य जर कठीण, असह्य वाटत असेल तर आपण ज्या लोकांमध्ये राहतो, जे आपले आहेत, तेच रोज शोषित, उपेक्षित आणि दुर्लक्षित राहत असतील आणि जर आपल्याला त्यांच्यासाठी आणि स्वतःसाठीही थोडंसं जरी प्रेम वाटत असेल तर आपल्या मनात पहिली प्रतिक्रिया काय येते? 'बदल हवा'. पण बदल करायचा म्हणजे, आधी सध्याची स्थिती समजून घेतली पाहिजे. जी व्यवस्था सतत आपल्याला 'हे असंच असतं' असं सांगत राहते, तिची खोल रचना उलगडायची असेल, तर त्यासाठी आपल्याला एक भक्कम विचारपद्धत लागते.

हेच मार्क्सचं खरं योगदान आहे. केवळ भांडवलशाहीवर टीका नव्हे, तर समाजाचा अभ्यास करण्याची एक क्रांतिकारी पद्धत देणं. कारण, समतावादी, मुक्त आणि न्याय्य अशा समाजाचं स्वप्न हे फक्त कल्पनेतून (utopia मधून) येत नाही. त्यासाठी आजचा वर्तमान, त्याच्या वेदना, त्यांतील विसंगती समजून घ्याव्या लागतात. हे समजून घेण्याच्या प्रक्रियेत, इतिहासातील आणि समाजातील संघर्षांची मुळे उलगडत जातात. त्यातूनच निर्माण होते, मार्क्सची विचारपद्धती जी आपल्याला केवळ गोष्टींचं विश्लेषण करायला शिकवत नाही, तर त्या गोष्टींना बदलायला लायक ज्ञान देत जाते.

मार्क्स हा कोरड्या तत्त्वज्ञानाचा अभ्यासक नव्हता. जसे मार्क्सचे लोकप्रिय वाक्य सांगितले जाते “Philosophers have only interpreted the world, however point is to change it.” परंतु हे वाक्य अनेकदा चुकीच्या पद्धतीने घेतले जाते. मार्क्स इथे फक्त कृती करा आणि खूप थिअरी झाली असे म्हणत नाही. तर तो कृती आणि सिद्धांत यांचे एकमेकांशी असलेले अतूट नाते अधोरेखित करताना, सिद्धांतांशिवाय कृती नाही असे अधोरेखित करतो. आपल्याला आजची खरी परिस्थिती काय आणि ती कुठल्या प्रक्रियांमधून उत्पन्न झाली हेच नाही कळले, तर आपण काय बदलणार

आहोत? मार्क्सला फक्त 'स्वप्न' आणि फक्त सत्य नव्हे, तर सत्याकडे जाण्याची 'पद्धत' शोधावीशी वाटली. जी आपल्याला सत्तेच्या पडद्याआड पाहायला शिकवते आणि विरोधाभासांमधून सत्य गाठायला शिकवते.

**मार्क्सचे पद्धतिशास्त्र**

मार्क्सच्या संपूर्ण पद्धतीचा, तिच्या तर्कशुद्ध खोलपणाचा आणि संकल्पनांच्या गुंतागुंतीचा वेध एका छोट्याशा लेखात घेणं शक्यही नाही आणि तसं करणं हा माझा उद्देशही नाही. कारण त्याच्या विचारविश्वात एकेका संकल्पनेभोवती एक अख्खं जग फिरतं. ऐतिहासिक आणि द्वंद्वात्मक भौतिकवाद, वर्गसंघर्ष, अधिशेष/वरकड मूल्य (surplus value), परात्मभावीकरण (alienation), भांडवलाचे प्रवाह (capital flows), वर्ग-संघर्ष (Class-Struggle) हे सगळे केवळ शब्द नाहीत, ते संपूर्ण संरचनात्मक विश्लेषणाचे आयाम आहेत. पण या लेखात मी या संज्ञांची यादी मांडणार नाही; उलट, मार्क्सने जगाकडे पाहण्याचा जो दृष्टिकोन विकसित केला, तो कसा होता, त्याच्या काळात त्याने जे प्रश्न विचारले, त्यामागे कोणतं तत्त्वज्ञान होतं यावरच जास्त जोर राहील.

खुद्द मार्क्सने स्वतंत्रपणे त्याच्या पद्धतिशास्त्रावर एकसंध लिहिलेलं नाही. मुळात मार्क्सच्या पद्धतिशास्त्राविषयी त्याच्या स्वतःच्या लिखाणातून अंदाज लावणे हे एक जिकरीचे काम होते. सुदैवाने ते पेलण्याचे काम काही क्रांतिकारकांनी, प्राध्यापकांनी आणि संशोधकांनी लीलया पेलले. जसे लेनिन, माओ, स्टुअर्ट हॉल, बर्तेल ऑलमन, जैरुस बनाजी आणि इतर शेकडो, लाखो अनेक. तरीही त्याने १८५७मध्ये लिहिलेल्या आणि मृत्युपश्चात १९३९मध्ये प्रकाशित झालेल्या ग्रुंडरिसे (Grundrisse) या ग्रंथात त्याच्या अभ्यास पद्धतीविषयी लिहून ठेवलेले आढळते. परंतु ग्रुंडरिसे वाचून त्यातील मार्क्सला अपेक्षित असणाऱ्या अर्थांचा शोध घेणे अवघड आहे. कारण या ग्रंथातील भाषा अधिक त्रोटक, वाचण्यास आणि समजण्यास जटील आहे. असे म्हटले जाते की ग्रुंडरिसेला जी प्रस्तावना मार्क्सने लिहिली, जिला '1857 Introduction' म्हणून ओळखले जाते, ती कॅपिटल ग्रंथाची नांदी होती आणि तीत मार्क्सने कॅपिटलमध्ये वापरलेल्या पद्धतिशास्त्राविषयी इत्यंभूत माहिती मिळते.


तुम्ही मार्क्सवादी असाल किंवा नसाल, तुम्ही मार्क्स वाचला असेल किंवा नसेल, त्याच्या विचारांशी सहमत असाल किंवा नसाल. त्याने फारसा फरक पडत नाही. कारण मार्क्सने दिलेली समाजाविषयीची विचारपद्धत आणि त्याच्या रचनात्मक, शिस्तबद्ध मांडणीशास्त्राने या जगात आमूलाग्र बदल आणला. पण एकदा का तुम्ही मार्क्सच्या पद्धतिशास्त्राला व्यवस्थित समजून घेतलं, की मग जुन्या जगात परत जाणं अशक्य होतं. कारण त्याच्या पद्धतीमुळे समोर येणारं नवं जग हे जुन्या जगापेक्षा आमूलाग्र वेगळं आणि समताधिष्ठित असतं. त्याचा ऊहापोह पुढे करूयात.

**विज्ञान, सामाजिक वास्तव आणि विचार : एका पद्धतीचा शोध**

आपण ज्या जगात राहतो, ते फक्त आपल्याला दिसणाऱ्या वस्तूंनी भरलेलं नाही. विज्ञान सांगतं हे जग अनेक अणू-रेणूंच्या अनंत प्रक्रियांमधून बनलेलं आहे. आपण एखादा पदार्थ पाहतो सजीव असो की निर्जीव किंवा सृष्टीचा विविध स्वरूपातील आविष्कार पाहतो, तो कधीच एका निर्वात खोलीत (in vaccum) बनलेला नसतो. त्याचं अस्तित्व वेगळं, स्वतंत्र (isolated) असं नसतंच मुळी. तो पदार्थ किंवा आविष्कार हा सतत सभोवतालच्या परिस्थितीशी जोडलेला असतो आणि त्यांच्यात सतत एक प्रक्रिया सुरू असते.

यामुळे तो पदार्थ हयात असणाऱ्या रूपात सदैव दिसतो. तो रेणू आणि अणूंच्या एकमेकांसोबतीने परस्परसंबंधातून निर्माण होतो आणि त्याच्या अस्तित्वातील बदल हे सभोवतालच्या पर्यावरणातील बदलांवर अवलंबून असतात. या प्रक्रियेत, पर्यावरणातील आणि त्या पदार्थाच्या अंतर्गत बलांच्या (forces) परस्परसंबंधातूनच त्याचे अस्तित्व परिभाषित होते. या बलांचे प्रमाण नेहमीच सारखे नसते. काही इतरांपेक्षा अधिक सक्रिय आणि प्रभावशाली असतात. अशा प्रकारे आपल्या ज्ञानेंद्रियांद्वारे आपल्याला जाणवणाऱ्या आणि समजणाऱ्या या गोष्टींचे स्वरूप आपल्यासाठी त्यांचे तात्काळ वास्तव (immediate reality) बनते.

जणू काही एखादा झाडाचा पालापाचोळा, जो वाऱ्याच्या झुळकीनुसार वळतो, वाकतो, फडफडतो. आपण त्याला पाहतो, पण लक्षात घेत नाही की त्या हालचाली फक्त त्याच्या स्वतःच्या नसून त्याच्या सभोवतालच्या गतीशी एकरूप झालेल्या असतात. त्याचप्रमाणे, कुठल्याही वस्तूचा खरा अभ्यास म्हणजे तिच्या आतल्या आणि बाहेरच्या हालचाली,



*दोन शतके उलटून गेली तरीही कार्ल मार्क्स कालबाह्य होत नाही. लौकिकार्थाने तो या जगातून निघून गेला असला तरीही तो आणि त्याचा विचार मरत नाही. म्हणूनच आजही जगभरातून लोक त्यांच्या थडग्यापुढे जमा होतात. ते त्याचे थडगे बघण्यासाठी नव्हे, त्याच्या विचारांचा जागर करण्यासाठी...*

तिचं होत (being) जाणं हे समजून घेणं.

आता, विज्ञानासमोरचे आव्हान आणि काम असते त्या पदार्थ किंवा इंद्रियगोचर गोष्टींच्या (phenomenon) तात्काळ वास्तवापासून अभ्यास सुरू करून, उलट्या दिशेने, म्हणजे मागोवा घेत, अणू-रेणू, बल आणि त्यांचं पर्यावरणाशी असलेलं नातं उलगडणं. ही असते विज्ञानाची वास्तव व सत्य समजून घेण्याची प्रक्रिया. या प्रक्रियेत एक अत्यंत महत्त्वाचे तत्त्व आहे, की तुम्ही कोणत्याही वस्तू/पदार्थ/घटनेचा अभ्यास वेगळेपणाने (अलग ठेवून/in isolation) करू शकत नाही; तर त्या वस्तूचा अभ्यास तिच्या हालचालीत (motion) आणि उत्क्रांतीतच (in development) करावा लागतो.

हे झालं विज्ञान. पण मग प्रश्न येतो ही जी पद्धत विज्ञानात वापरली जाते, ती आपण समाजाच्या, अर्थव्यवस्थेच्या, राजकारणाच्या अभ्यासासाठी वापरू शकतो का? हजारो वर्षांपासून या प्रश्नावर विचार सुरू आहे. समाज ही प्रयोगशाळा नाही, हे खरं; पण समाजही एक सदैव हालचालीत असलेली, सतत घडत-बिघडत जाणारी गोष्ट आहे. त्यामुळे नैसर्गिक विज्ञानातील प्रयोग जशाच्या तसा समाजशास्त्रात उतरवता येत नसला, तरी त्यातील तत्त्वं विशेषतः काही पद्धती या अभ्यासासाठी उपयुक्त ठरू शकतात.

इथेच मार्क्स महत्त्वाचा ठरतो. अशा अभ्यासाचे आणि तत्त्वांचे स्वरूप काय असावे यावर मार्क्सचे योगदान खूप मोठे मानले जाते आणि जायलाच हवे. त्यासाठी मार्क्स १९व्या शतकातील भांडवलशाही आणि समाजाविषयी काय नोंदून ठेवतो किंवा तो २०च्या आणि २१व्या शतकातील प्रारूपांविषयी काय भविष्यवाणी करतो यापेक्षा जास्त महत्त्वाचे आहे, की त्याची द्वंद्वात्मक पद्धत काय आहे.

**द्वंद्वात्मक पद्धत (Dialectics) : परस्परसंबंधांमधील गतिशील विश्लेषण**

मार्क्सचं द्वंद्वात्मक पद्धतिशास्त्र ही फक्त शाब्दिक कोडी सोडवण्याची गोष्ट नाही, तर वास्तवाचा हालचालशील (reality in motion) अभ्यास करण्याची पद्धत आहे. आपल्याला आजही जगातील बऱ्याच गोष्टी ज्या प्रकारे घडतात त्या तशा का घडतात याची कल्पना नाही. पण मार्क्सवादी म्हणून आपण विचारले पाहिजे - त्या जाणून घेता येतील का? त्यापुढे मानव म्हणून आपले काम त्यांना जाणून घेण्याचा आणि समजून घेण्याचा प्रयत्न करणे आहे. नैसर्गिक विज्ञानांप्रमाणे द्वंद्ववादाचा पहिला नियम आहे. तो म्हणजे, या सामाजिक घटना त्या घडत असताना किंवा त्यात बदल होत असताना अभ्यासणे.

सामाजिक घटनांचा त्यांच्या गतिशीलतेत अभ्यास यासाठी अपरिहार्य आहे कारण कुठलीही घटना किंवा सामाजिक संकल्पना स्थिर नसते. त्यात सातत्याने बदल होत असतो. हा लेख वाचतानाचे तुम्ही व मी आणि इथवर येऊन पोहोचल्यावरचे तुम्ही व मी वेगळे आहोत. वेळ (time), काल (epoch) आणि अवकाश (spaces) बदलले की घटनांचे आणि संकल्पनांचे स्वरूप बदलते. या सतत बदलणाऱ्या सामाजिक घडामोडींचा त्यांच्या चालू स्थिती अभ्यास करताना आपल्याला त्यातून त्यामागील सूक्ष्म व ठळक दोन्ही प्रक्रियांविषयीची माहिती मिळते. ज्याने आपले विश्लेषण किंवा अन्वेषण अधिक परिपक्व बनते.

मार्क्सवादी तत्त्वज्ञानानुसार नैसर्गिक विज्ञान आणि

सामाजिक विज्ञान यात एक महत्त्वाचा फरक आहे. नैसर्गिक विज्ञानांतील निष्कर्ष आणि त्यांच्या विकासातून तुम्ही अधिक सूक्ष्म सिद्धांताकडे पुढे सरकतात आणि शेवटी उरलेले अपरिवर्तनीय घटक (irreducible matter) (उदा. अणू, neutron, proton, electron) मिळाले की आपले प्रयोग थांबतात. परंतु, सामाजिक विज्ञानात असे नाही. मार्क्सवादी तत्त्वज्ञान सांगते, अशी नैसर्गिक प्रमाणे वापरून सामाजिक घटनांचा व संकल्पनांचा अभ्यास केल्यास आपल्याकडे शेवटी उरते, (विश्लेषणाचा शेवटचा घटक म्हणून) ती एक व्यक्ती/मानव. असे तत्त्वज्ञान आपल्याला व्यक्तिकेंद्री मानसिकतेकडे किंवा व्यक्तिवादाकडे नेते. असा व्यक्तिवाद हा सामाजिक जीवनाच्या विरोधातील आहे. परंतु, मानव ही एक सामाजिक प्रजात आहे. व्यक्ती जर स्वकेंद्री झाली, तर तिचे सगळे विचार व आचार हे स्वसंरक्षणार्थ समाजाच्या उन्नतीविरोधात उभे ठाकतात. असे व्यक्तिकेंद्री तत्त्वज्ञान हे आपल्याला उदारमतवाद, भांडवलशाहीत आढळते. जेथे व्यक्तिकेंद्री तत्त्वज्ञान असूनसुद्धा व्यवस्थेच्या पातळीवर ते प्रत्यक्षात व्यक्तिविरोधी स्वरूप धारण करते.

नैसर्गिक विज्ञान पद्धतीचा असा धोका टाळताना आपण अनेकदा अधिभौतिक (metaphysical) तत्त्वज्ञानाच्या जाळ्यात अडकतो. अधिभौतिक विचार म्हणजे वास्तवातल्या भौतिक आणि ऐतिहासिक परिस्थितींपासून वेगळं झालेलं, अति-सामान्य आणि कालातीत असं काहीतरी गृहीत धरणं. आपण मग 'माणूस असाच असतो/ते', 'हुशारी ही उपजतच असते', 'लोकशाही म्हणजे सार्वकालिक मूल्य', 'मेहनत केली की यश मिळतंच' अशा संकल्पनांवर विश्वास ठेवतो. पण यामागे जे वास्तव दडलेलं असतं जसं की जात, वर्ग, लिंग, शिक्षणव्यवस्था, पोषण, सामाजिक संधींचं वितरण हे सगळं नजरेआड केलं जातं. अशा विचारांनी आपण माणसाच्या वागण्यामागचे सामाजिक संदर्भ बाजूला ठेवतो आणि सगळी जबाबदारी त्या व्यक्तीवरच ढकलतो.

उदाहरणार्थ, जर एखाद्या विद्यार्थ्या/विद्यार्थिनीला चांगल्या संधी मिळत नाहीत, तर आपण लगेच म्हणतो, की तिच्यात 'मेरिट' नव्हतं. पण 'मेरिट' म्हणजे काय? ती फक्त गुणांची सरासरी आहे का? की ती एक सामाजिक प्रक्रिया आहे जी योग्य पोषण, दर्जेदार शिक्षण, घरातील वातावरण, भाषिक कौशल्ये आणि सामाजिक ओळखी यावर अवलंबून असते? ही सगळी पार्श्वभूमी लक्षात न घेता जर आपण 'मेरिट'सारख्या संकल्पनांना कालातीत, सर्वसामान्य मूल्य समजून वापरत राहिलो, तर आपल्याला सामाजिक विषमता दिसेनाशी होते.

मार्क्सची पद्धत अधिभौतिकतेच्या या गोंधळाला छेद देते. तो आपल्याला शिकवतो की, कोणतीही गोष्ट तिच्या सामाजिक-भौतिक संदर्भांपासून वेगळी ठेवून समजून घेणं ही चूक आहे. त्यातही समजून घेणं म्हणजे नुसतं स्पष्टीकरण देणं नव्हे, तर त्या प्रक्रियेला इतिहास, संघर्ष आणि बदलाच्या प्रवाहात ठेवून पाहणं. आणि म्हणूनच, मार्क्सवादी पद्धत ही वास्तवातील हालचालींचा मागोवा घेणारी, सतत प्रश्न विचारणारी आणि प्रत्यक्ष परिस्थितींमध्ये खोल जाऊन अर्थ शोधणारी आहे.

अधिभौतिक विचारसरणीमधून आपण घटनांचा आणि संकल्पनांचा भूतकाळाशी, वर्गीय वास्तवाशी, सत्तासंबंधांशी असलेला संबंधच विसरतो. मग श्रम, शोषण, सत्ता, इतिहास यांचं विश्लेषण न करता आपण काही संकल्पना जशा आहेत तशाच स्वीकृत करतो. पण मार्क्सवादी दृष्टिकोन आपल्याला हेच विचारायला शिकवतो की कोणत्याही संकल्पनेचं रूप काय आहे, आणि ते कशामुळे असं झालं आहे? म्हणूनच द्वंद्वात्मक पद्धत आपल्याला विश्लेषणासाठी काही खास साधनं देते जी आपल्याला फक्त विचार न करता विचारांच्या घडण्या-बिघडण्याच्या प्रक्रियेकडे पाहायला शिकवतात. याच पद्धतीची पहिली पायरी म्हणजे, सामाजिक वास्तवाच्या गतिशीलतेला समजून घेण्यासाठी त्याच्या अंतर्गत ताणतणावांचं (contradictions), फरकांतील समानता (identity/difference), प्रमाण आणि गुणधर्माच्या बदलांचं (quantity/quality) सखोल निरीक्षण करणं आहे.

हे चार घटक द्वंद्वात्मक पद्धतिशास्त्र समजून घेण्यासाठीचे साधन आहेत. जसे भांडवलशाही स्वतःला कशी टिकवते, तर भेद निर्माण करून, विरोध आत्मसात करून, आणि बदलांच्या माध्यमातून स्वतःला सुधारल्यासारखं दाखवून. वरवर या कॉलेजेस आणि विद्यापीठांच्या चार भिंती आतल्या चर्चेच्या गोष्टी जरी वाटत असल्या, तरी जेव्हा यांचा वापर केला जातो तेव्हा त्या रोजच्या दैनंदिन जीवनातील कोडे सोडवण्याची सुद्धा क्षमता राखून असतात.

**१. समानता / फरक :**

भांडवलशाहीचे किंवा कुठल्याही दमनकारी व्यवस्थेचे एक



*वर्तमानात जे घडतेय, त्याला पोथ्यापुराणातल्या कथा-कहाण्या नव्हे, तर भौतिक जगाचा भूतकाळ कारणीभूत आहे, हा विचार मांडून मार्क्सने भूतकाळातल्या परस्परसंबंध आणि हितसंबंधांचे वैज्ञानिक दृष्टिकोनातून विश्लेषण केले, त्यातून जगाला अधिक न्याय्य बनवणारे तत्त्वज्ञान आकारास आले...*

गमक म्हणजे गोष्टी, व्यक्ती, आणि सामाजिक संकल्पनांमध्ये भेद निर्माण करून त्यांच्या सत्तेला फायद्यात आणणे. थोडक्यात एकाच गोष्टीची अनेक शकले बनवणे आणि आपल्यासमोर एक मृगजळ तयार करणे. उदाहरणार्थ, १) वस्तू एकच पण अनेक ब्रँड्स आणून त्यांना वेगवेगळे भासवणे. २) औरंगाबादमध्ये रस्त्यावर झाडू मारणारी एक दलित महिला आणि बंगळुरूत ॲपवरून किराणा पोचवणारा मुस्लिम गिग वर्कर. एकमेकांपासून दूर वाटणाऱ्या या कामांमध्ये एक गोष्ट सामायिक आहे श्रम. ही श्रम नावाची गोष्ट भांडवलशाहीत धूसर होते. या दोघांचं काम, व्यक्तिमत्त्व आणि ठिकाण वेगळं असलं, तरी ते दोघेही भांडवलासाठी वरकड मूल्य किंवा फायदा निर्माण करतात. मात्र त्याचा मोबदला त्यांना मिळत नाही. नफा, भाडे आणि व्याज हे उत्पन्नाचे वेगवेगळे प्रकार वाटतात, परंतु ते सर्व श्रमातून मिळवलेल्या वरकड मूल्यातून मिळतात. भांडवलशाही ही वर्गीय एकजूट विसरायला लावते. भारतीय संदर्भात, जात आणि धर्म अनेकदा वर्ग ऐक्य धूसर करतात. हिंदुत्वाचे राजकारण या फरकांना शस्त्र बनवते, भांडवलाखालील समान शोषण आणखी लपवते.

भांडवलशाही, जात, लिंग, धर्म अशा अनेक रचनेत फरकांचा वापर हा केवळ सामाजिक किंवा सांस्कृतिक प्रश्न नसतो तर तो सत्तेच्या टिकावासाठीचा एक डाव असतो. हे फरक निर्माण करून, कायम ठेवून आणि त्यामागचं ऐतिहासिक-सामाजिक वास्तव लपवून व्यवस्थाच आपल्याला सत्यापासून दूर नेत असते. अशा परिस्थितीत मार्क्सवाद आपल्याला एक वेगळी दिशा दाखवतो. तो सांगतो की हे फरक नजरेआड करून चालणार नाहीत तर त्यांचं विश्लेषण करून, त्यामधील समान संघर्ष, सामायिक शोषण ओळखून आपल्याला एका व्यापक आणि एकसंध विश्लेषणाकडे जायचं आहे. म्हणजेच फरकांच्या समजुतीतूनच आपण वर्गीय ऐक्याकडे, समताधिष्ठित संघर्षाकडे जाऊ शकतो. हीच प्रक्रिया 'टोटॅलिटी' म्हणजेच एकात्म दृष्टिकोन घडवते जिथे वेगवेगळ्या अनुभवांचे, ओळखींचे, शोषणाच्या रूपांचे थर एका एकत्रित सामाजिक वास्तवात गुंफले जातात. अशा प्रकारे 'समानता/फरक' ही केवळ वैचारिक संकल्पना न राहता, ती व्यवस्थेच्या विरोधाभासांना उघड करणारी आणि संघर्षाची दिशा ठरवणारी ठरते.

**२. विरोधांचं परस्परसंवेदन :**

कोणतीही गोष्ट एका घटकाच्या प्रभावावर नाही, तर ती तिच्या आजूबाजूच्या परिस्थितीवर अवलंबून असते. उदाहरणार्थ, गोंड आदिवासी महिलेच्या स्वयंपाकघरात आलेला गॅस सिलिंडर एका बाजूने 'राज्याचा विकास' वाटतो, पण दुसऱ्या बाजूने ते तिच्या पारंपरिक अन्नसंस्कृतीच्या संहाराचं लक्षण असते. एखाद्या मुस्लिम वस्तीत उभारलेलं मंदिर एकाला 'सांस्कृतिक विविधता' वाटू शकतं, तर दुसऱ्यासाठी ते रोजच्या भीतीचं प्रतीक असू शकतं. कोणती गोष्ट कशी दिसते, हे बघणाऱ्याच्या स्थानावर अवलंबून असतं. हीच समज मार्क्सची द्वंद्वात्मकता देऊन जाते-म्हणजेच, वेगवेगळ्या नजरेतून येणाऱ्या अर्थांचे अंतःसंबंध.

**३. प्रमाण/गुणधर्म** (Quantity/Quality) **:**

कधी कधी बदल गाजावाजा न करता होतात, पण त्याचा परिणाम भयंकर असतो. आज भारतात लाखो ठिकाणी लावलेले सीसीटीव्ही, आधार कार्ड, फेस रेकग्निशन हे सगळं एकत्र येऊन हळूहळू लोकशाहीला अधिकाधिक तंत्रनियंत्रित बनवत आहे. स्त्रिया मोठ्या प्रमाणात कामाच्या जागांमध्ये सहभागी होत आहेत, ही वरवर 'प्रगती' वाटते. पण जर त्यांना फक्त अनौपचारिक, अल्प-मोबदल्याच्या, केअर वर्कसारख्या नोकऱ्यांमध्येच सामावून घेतलं जात असेल, तर हा केवळ संख्यात्मक समावेश आहे, गुणात्मक सक्षमीकरण नाही. मार्क्स सांगतो की, कधी 'थोडं थोडं' गोळा होऊन 'सर्वस्वी' काहीतरी बदल घडतो, हे ओळखणं आवश्यक आहे.

**४. विरोधाभास (Contradiction) :**

मार्क्सच्या विचारात विरोधाभास हे केवळ गैरसमज नव्हे, तर परिवर्तनाचं मूळ आहे. उदाहरणार्थ, भारतात शेअर बाजार उंच झेप घेतोय, पण कामगार असुरक्षिततेकडे, असंघटिततेकडे ढकलले जात आहेत. कल्याणकारी योजना पेपरावर दिसतात, पण जमिनीवर हरवतात. 'भारत माते'ची पूजा होते, पण स्त्रीच्या शरीरावर तिचा हक्क नाकारला जातो. ही विसंगती नव्हे, तर ही भांडवलशाहीचीच अंतर्गत रचना आहे. मार्क्स म्हणतो, की या प्रणालीच्या आतूनच तिचा शेवट उगम पावतो, कारण ती स्वतःच निर्माण केलेल्या संघर्षांना पेलू शकत नाही.

मार्क्सच्या संपूर्ण द्वंद्वात्मक पद्धतीत विरोधाभास (Contradiction) ही सर्वात महत्त्वाची आणि केंद्रीय संकल्पना आहे बौद्धिक दृष्टिकोनातूनही आणि राजकीयदृष्ट्याही. मार्क्ससाठी विरोधाभास म्हणजे केवळ वैचारिक विसंवाद नाही, तर वास्तवात अस्तित्वात असणारी आणि व्यवस्थेच्या गाभ्यात निर्माण होणारी टणक टक्कर आहे. विरोधाभास तेव्हाच निर्माण होतो, जेव्हा एका व्यवस्थेतील वेगवेगळे घटक एकमेकांवर अवलंबून असतात, पण त्यांचा विकास परस्परविरोधी दिशांनी जातो. काही काळासाठी ते सहअस्तित्वात राहू शकतात, पण शेवटी ते एकमेकांना तोडायला लागतात हेच संकटाचं मूळ असतं.


उदाहरण म्हणून, भारताची सध्या मांडली जाणारी विकासगाथा पाहा. जीडीपी वाढतोय, शेअर बाजार झपाट्याने चढतोय; पण दुसऱ्या बाजूला मजुरांचे वेतन वाढत नाही, असंघटित रोजगार फोफावतोय, आणि कामगारांच्या खरेदीशक्तीत घसरण होतेय. ही निव्वळ विसंगती नाही, तर भांडवलशाहीचा अंतर्गत विरोधाभास आहे. उत्पादन वाढवताना जो नफा मिळतो, तोच नफा कामगारांच्या उपभोगशक्तीवर गदा आणतो. जेवढं उत्पादन होतं, त्याचा उपभोग करायला मजुरांकडे पैसेच उरत नाहीत. यातूनच अतिउत्पादन (over-production) आणि अल्पखप (under-consumption) यासारख्या आर्थिक संकटांचं चक्र सुरू राहतं.

भारतात हे विरोधाभास केवळ आर्थिक पातळीवरच नाहीत. हिंदुत्ववादी राजकारण हिंदू एकतेचा नारा देतं, पण प्रत्यक्षात ते जातिभेद, वर्णव्यवस्था आणि सामाजिक विषमता यावरच उभं आहे. 'सबका साथ' म्हणणाऱ्या सरकारच्या कारभारात दलित आणि मुस्लिमांवर दररोज या ना त्या कारणाने अन्याय होतो. स्त्रियांना सशक्तीकरणाच्या घोषणा तेवढ्या मिळतात, पण त्यांचं वास्तवातलं काम हे घरकाम, केअर वर्क, आणि असंघटित श्रमात अडकलेलं असतं. या विसंगती दुहेरी भूमिका नसून, त्या आहेत व्यवस्थेच्या अंतर्गत ताणतणावांचं मूर्त रूप, जे बदल नाकारताना विरोधही आत्मसात करतात.

मार्क्ससाठी विरोधाभास ही अडचण नसून परिवर्तनासाठीची शक्यता असते. विरोधाभास समजून घेतल्याशिवाय आपण खऱ्या प्रश्नांवर पोहोचत नाही. सामान्य विचारसरणी एखाद्या प्रश्नासाठी बाह्य शत्रू शोधते. द्वंद्वात्मक विचार मात्र विचारतो: स्वतः व्यवस्थेच्या आत काय आहे, जे तिचं स्वतःचं विघटन घडवतंय? भांडवलशाही स्वतःच्या विरोधाभासांमुळेच कोसळते काही वेळा ते तिला पेलवत नाहीत, आणि कधी नव्या संघर्षांचं रूप घेतात.

पण या विरोधाभासांमुळे व्यवस्था आपोआप कोसळेल, असा निष्कर्ष काढणं ही मोठी चूक ठरेल. कारण कोणतीही शोषण करणारी व्यवस्था मग ती भांडवलशाही असो, जातव्यवस्था असो, किंवा धर्माच्या आधारे सत्तेवर बसलेली व्यवस्था असो ती तिच्या अंतर्गत विरोधाभासांमुळेच ढासळू शकते हे खरं; पण ते विरोधाभास बदलात कधी आणि कसे रूपांतरित होतील, हे अंतिमतः वर्गसंघर्ष, प्रतिकार, आणि जनतेच्या संघटित कृतीवर अवलंबून असतं. मार्क्ससाठी इतिहास हा केवळ घडून गेलेला प्रसंग नव्हे, तर तो निर्माण करण्याचा विषय आहे आणि म्हणूनच वर्गसंघर्ष हे इतिहासाचे इंजिन आहे. आज आपल्या समोर उभ्या असलेल्या संकटांना समजून घेण्यासाठी आणि बदल घडवण्यासाठी फक्त विरोधाभास उघड करणं पुरेसं नाही; तर त्यातून राजकीय चळवळ, संघटन आणि समता-अस्तित्वाच्या नव्या शक्यतांचा मार्गही शोधावा लागतो. संघर्षाशिवाय परिवर्तन शक्य नाही आणि परिवर्तनाशिवाय माणूस स्वतःचं स्वातंत्र्यही मिळवू शकत नाही.

मार्क्सच्या पद्धतीतील अजून एक मूळ आणि मुख्य भाग आहे इतिहास. आपल्याला जर आजचं जग समजून घ्यायचं असेल, तर त्याचा इतिहास समजून घ्यावा लागतो. जसं एखादा मानसोपचारतज्ज्ञ आपल्या वर्तमान चिंता समजून घेण्यासाठी तुमचं बालपण समजून घ्यायला सांगतो, तसं मार्क्सही म्हणतो की वर्तमानाचं विश्लेषण करण्यासाठी त्याचा भूतकाळ



*जग आहे ते असेच आहे, ते बदलत का नाही, याचा शोध घेताना मार्क्सने शोषक आणि शोषितांमध्ये पूर्वापार ताणाचा आणि त्यातून उद्‌भवणाऱ्या विषमतेचा सखोल अभ्यास केला. साधन साम्रगीवर, संपत्तीवर ताबा नसल्याने कामगार हे कायमच शोषितांचे आयुष्य जगतात. त्यांच्या आयुष्यात बदल घडून येण्यासाठी कामगारवर्गाचा साधनसंपत्तीवर एकसमायिक ताबा असला पाहिजे, हा विचार मार्क्स तत्त्वज्ञानाने जगाला दिला...*

उलगडावा लागतो. कारण वर्तमान हे एका वेगळ्या आणि स्वतंत्र काळाचं उत्पादन नसतं, तर ते भूतकाळातील संघर्षांनी, तुटक्यांनी (ruptures) आणि अखंडतेनं भरलेलं एक संरचनात्मक अवशेष असतं. मार्क्ससाठी इतिहास म्हणजे तथ्यांचं संग्रहालय नव्हतं, तो आहे चळवळीचा प्रवाह. हा प्रवाह विरोधाभासांनी चालतो, संघर्षांमधून उगम पावतो आणि बदल घडवतो.

जर हे जग आणि त्याचा इतिहास समजून घेण्यासाठी खूप गुंतागुंतीचे, अशक्य वाटत असेल, तर आपली साधनं शुद्ध, अधिक गुंतागुंतीची तरीही नेमकी, अधिक द्वंद्वात्मक बनवायला हवीत. हेच मार्क्सच्या विचारपद्धतीतील मोठं आव्हान आहे. परंतु मार्क्स म्हणतो, योग्य पद्धतीनं विचार केल्यास, समाजातील कितीही गुंतागुंतीच्या प्रक्रियांना आपण उकलू शकतो. आणि म्हणूनच त्या बदलण्यास पात्र ठरतात.

म्हणूनच, मार्क्सवादी पद्धत ही केवळ भूतकाळाचं विश्लेषण करणारी एक स्थिर चौकट नाही, तर समाजाचं वैज्ञानिक पद्धतीने अध्ययन करून त्याला अधिक न्याय्य बनवण्यासाठी केलेला एक अखंड शोध आहे. जसं विज्ञानात एखादी संकल्पना मांडली जाते, तिचं परीक्षण होतं, आव्हान दिलं जातं, पुन्हा नव्या सिद्धांतांची शक्यता उगम पावते, तसंच काहीसं मार्क्सवादी विचारविश्वातही घडतं. ही गुंतागुंत, ही असहमती, हे संशोधन हे त्या पद्धतीचं अपयश नाही, तर तिच्या जिवंतपणाचे लक्षण आहे.

म्हणूनच मार्क्सवादात मार्क्सला मान्य करणं जितकं महत्त्वाचं आहे, तितकंच त्याच्याशी वाद घालणं, त्याच्यावर टीका करणं आणि तरीही त्याच्या पद्धतीने नव्या वास्तवाचं विश्लेषण करत राहणं हेही महत्त्वाचं आहे. मार्क्सवादी स्त्रीवाद, ब्लॅक मार्क्सिझम, दलित डाव्या चळवळींमधून आलेल्या टीका या सगळ्या त्या जिवंत चर्चेचा भाग आहेत. या फारकती नाहीत. तर मार्क्सच्या पद्धतीचा सन्मान करत, नव्या ऐतिहासिक संकल्पनांचा वेध घेत राहतात. मार्क्स कदाचित या वादविवादांनी हरखून गेला असता कारण हे वाद त्याच्या थडग्यात विसावलेल्या पार्थिवाला नव्हे, तर त्याच्या विचारपद्धतीला सन्मान देतात. कदाचित त्याच्या थडग्यात डाव्या कुशीवर वळत, स्मित हास्य करत, त्याच्या अंतःकरणात कुठेतरी, तोही वाट बघत असेल की एक दिवस, ही सगळी वैचारिक घालमेल, संघर्ष आणि चळवळी एकत्र येतील, आणि ही शोषणावर उभी असलेली व्यवस्था उलथून टाकतील.

**(लेखक किंग्स कॉलेज, लंडनमधील इंटरनॅशनल डेवलपमेंट आणि जियोग्राफी विभागात पी.एचडी. अभ्यासक आहेत. त्यांचे संशोधन मुख्यत : कामगार (श्रम), तंत्रज्ञान, आणि सार्वजनिक वित्त यांच्या अर्थराजकीय व्यवस्थेवर केंद्रित आहे.**
**संपर्क : ९६५७७९९९८६,**
**ईमेल:** hiteshdpotdar@gmail.com)